**निशाणी क्रमांक – ५९**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०४</u>**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नांव – शुभम शिवाजी सरवदे,

वय – २१ वर्षे, धंदा – शिक्षण,

रा.अहमदपूर, ता.अहमदपूर, जि.लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एन. ए. भांगे.</u>**

**०१.** मी सर्व आरोपींना ओळखतो. आरोपी क्र.३ व ६ यांच्या गैरहजेरी माफीचा अर्ज निशाणी ५६ वर आहे. उर्वरीत सहा आरोपी न्यायालयात हजर आहे. घटना दिनांक १५.०३.२०२३ रोजी घडलेली आहे. आदल्यादिवशी १४ तारेखला रात्री संभाजी जयंती होती त्यादिवशी माझ्या मम्मी पप्पांची कुरबुर झाली होती. रात्रीपासून त्यांचे बोलणे बंद होते. सकाळी मी फिरायला गेलो होतो. मला छोट्या भावाने सकाळी ११ ते ११.३० वाजता फोन केला की, मम्मीने मामांना फोन केला आहे, ते सर्वजण घरी येणार आहेत, तु घरी ये. मी १२ ते १२.३० वाजता येऊन दुकानामध्ये बसले होतो. त्यावेळी सर्व आरोपी व काहीही न बोलता मारायला चालू केले. दोन चार जण खाली होती व दोन चार वर पप्पांकडे गेले होते. मी ओरडल्यानंतर पप्पा व सर्वजण खाली आले. मला मारहाण चालू असताना पप्पांनी का मारता असे विचारले त्यावेळी त्यांनी

पप्पाच्या डोक्यात रॉड घातले. त्यांनी लाथा बुक्क्यांनी मलाही मारहाण केली. तेवढ्यात पोलीस गाडी आली. आरोपी मम्मीला व माझ्या छोट्या दोन भावांना घेऊन पळून गेले. पोलीसांनी घटनेबाबत माझ्याकडे चौकशी केली होती. आरोपी रॉडने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली होती. आता मला वस्तु क्र.अ व ब दाखवण्यात आले. त्यानेच मारहाण झालेली आहे.

सरतपास पुर्ण.

**(आरोपींतर्फेचा मुदतीचा अर्ज निशाणी ५७ नामंजूर. आरोपींतर्फे ज्युनीयर ॲ आर. डी. भताने हजर, आरोपींविरूध्द उलटतपास नाही.)**

श्रृवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

WADGAONKAR SWANANDI DEVIDAS

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.08.13 18:01:33 +0530

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**

दिनांक –१३.०८.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

अहमदपूर.

न्या.द.प्र.वर्ग.

**निशाणी क्रमांक – ५७**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नांव – शिवाजी बाबुराव सरवदे,

वय – ४४ वर्षे, धंदा – खाजगी नौकरी,

रा.अहमदपूर, ता.अहमदपूर, जि.लातूर.

**शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एन. ए. भांगे.**

**०१.** मी सर्व आरोपींना ओळखतो. आरोपी क्र.३ व ६ यांच्या गैरहजेरी माफीचा अर्ज निशाणी ५६ वर आहे. उर्वरीत सहा आरोपी न्यायालयात हजर आहे. घटना सन २०२३ मध्ये झाली होती, निश्चीत तारीख मला आठवत नाही. त्यादिवशी माझी व माझ्या पत्नीची तक्रार झाली होती. त्याबद्दल माझ्या पत्नीने तिच्या भावाला व वडीलांना फोन करून सांगितले होते. सर्व आठ आरोपी दुपारी ३ ते ३.३० वाजता माझ्या वर्कशॉपमध्ये आले. वर्कशॉपच्या वरती माझे घर आहे. वर्कशॉपमध्ये माझा मुलगा बसला होता व वर मी होतो. सर्व आरोपींनी माझ्या मुलास मारायला चालू केले. गर्दा उठल्यामुळे का मारत आहात असे म्हणून मी खाली आलो. त्यावेळी आरोपींनी मलाही मारहाण करण्यास चालू केले. आरोपी क्र.१ व २ यांनी रॉडने मला डोक्यात, कमरेवर, खुब्यावर व पायावर मारहाण केली. सर्व माणसे जमल्यामुळे पोलीसची गाडी आली. सर्व आरोपी माझ्या पत्नीला घेऊन व पैसे घेऊन फरार झाले. पोलीसांनी मी जखमी झाल्याने मला गाडीत टाकून सरकारी दवाखान्यात आणले. मी जास्त गंभीर असल्याने मला लातूर येथे पाठवण्यात आले. माझ्या मुलालाही मारहाणीमुळे हात फ्रॅक्चर झाला होता. इतर आरोपींनी मला व माझ्या मुलाला मारहाण केली. आता मला जप्त मुद्देमाल रॉड दाखवण्यात आले. त्यानेच मला मारहाण झालेली आहे त्यास **वस्तु क्र.अ व ब**

देण्यात येते. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र.५८** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**(आरोपींतर्फेचा मुदतीचा अर्ज निशाणी ५७ नामंजूर. आरोपींतर्फे ज्युनीयर ॲ आर. डी. भताने हजर, आरोपींविरूध्द उलटतपास नाही.)**

श्रृवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**

दिनांक –१३.०८.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

अहमदपूर.